# भारतातील २०.३ लाखांच्या पोलीसदलात वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांची संख्या १०००हून कमी, २०२५ इंडिया जस्टिस रिपोर्टमधील निरीक्षण

दक्षिण भागातील राज्ये आघाडीवर, कर्नाटकाने कायम राखले प्रथम स्थान

काही सुधारणा:

- ७८ टक्के पोलीस ठाण्यांमध्ये महिला सहाय्य डेस्क
- जिल्हा न्यायव्यवस्थेतील स्त्रियांचा वाटा ३८ टक्के
- ८६ टक्के कारागृहांमध्ये आता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधा उपलब्ध
- कायदेशीर सहाय्यावरील दरडोई खर्च २०१९ ते २०२३ मध्ये दुपटीने वाढून तो ६.४६ रुपयांवर पोहोचला

मात्र, राष्ट्रीय स्तरावर कायम राहिलेले दोष:

- पोलीसखात्यातील स्त्रियांसाठी असलेला स्वत:चा आरक्षित कोटा एकाही राज्याला/केंद्रशासित प्रदेशाला पूर्ण करता आलेला नाही
- जिल्हास्तरीय न्यायव्यवस्थेतील अनुसूचित जमातींचा वाटा ५ टक्के, तर अनुसूचित जातींचा वाटा १४ टक्के आहे
- पोलीसखात्यात अनुसूचित जमातींचा वाटा १२ टक्के, तर अनुसूचित जातींचा वाटा १७ टक्के आहे
- कायदेशीर सहाय्यकांच्या (पॅरालीगल व्हॉलंटीअर्स) संख्येने विक्रमी नीचांक गाठला आहे; गेल्या ५ वर्षांत ती ३८ टक्क्यांनी घटली आहे
  देशभरातील कारागृहांमध्ये मिळून केवळ २५ मानसशास्त्रज्ञ/मनोविकारतज्ज्ञ उपलब्ध आहेत

१५ एप्रिल, नवी दिल्ली: देशातील २०.३ लाखांच्या विशाल पोलीसदलात अधीक्षक व महासंचालक यांसारख्या वरिष्ठ पदांवरील स्त्रियांची संख्या १०००हूनही कमी असल्याचे, न्यायदानाच्या निकषावर राज्यांना क्रमवारी देणाऱ्या २०२५ इंडिया जस्टिस रिपोर्ट (आयजेआर) या भारतातील एकमेव यंत्रणेने आज प्रसिद्ध केलेल्या अहवालातून समोर आले आहे. आयपीएस अधिकाऱ्यांखेरीज अन्य अधिकाऱ्यांचा समावेश केला तरीही ही संख्या जेमतेम २५ हजारांच्या वर जाते. देशातील एकूण ३.१ लाख अधिकाऱ्यांमध्ये आयपीएस नसलेल्या स्त्री अधिकाऱ्यांचे प्रमाण ३.१ लाख आहे तर पोलीस खात्यातील ९० टक्के स्त्रिया कॉन्स्टेब्युलरीमध्ये आहेत.

आयजेआर या अनन्यसाधारण नियतकालिक अहवालामध्ये कर्नाटक राज्याला एकंदर पहिले स्थान प्राप्त झाले आहे, राज्याने १८ मोठ्या व मध्यम आकारमानाच्या राज्यांमधून (प्रत्येकी एक कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या) आघाडीचे स्थान पटकावले आहे. त्याखालोखाल आंध्रप्रदेशाचा क्रमांक आहे. हे राज्य २०२२ मधील पाचव्या स्थानावरून दुसऱ्या स्थानावर आले आहे, त्यापाठोपाठ तेलंगणा (२०२२ मधील क्रमवारीत तिसरे) आणि केरळ (२०२२ मधील क्रमवारीत सहावे) या राज्यांचे क्रमांक लागतात.

अन्य राज्यांच्या तुलनेत चार निकषांवर अधिक चांगली कामगिरी करून पाच दाक्षिणात्य राज्यांनी क्रमवारीत वर्चस्व राखले आहे. पोलिस (कॉन्स्टॅब्युलरी व अधिकारी स्तर) व जिल्हास्तरीय न्यायव्यवस्था या दोन्हींमध्ये जातीनिहाय कोटा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती- एससी, एसटी, ओबीसी व अन्य मागासवर्गीय) पूर्ण करणारे कर्नाटक हे एकमेव राज्य ठरले आहे. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या जागा रिक्त राहण्याचे प्रमाण केरळमध्ये सर्वात कमी आहे. कारागृह विभागात तमिळनाडूची कामगिरी सर्वोत्तम आहे. तमीळनाडूत कारागृहांत राहणाऱ्यांचा दर सर्वात कमी म्हणजे ७७ टक्के आहे, राष्ट्रीय सरासरी १३१ टक्के आहे. तेलंगण व आंध्रप्रदेश यांनीही अन्य सर्व राज्यांहून सरस कामगिरी केली आहे. विशेषत: पोलिसांच्या निकषावर या राज्यांनी अनुक्रमे १ला व २रा क्रमांक पटकावला आहे.

सात छोट्या राज्यांमध्ये (एक कोटींहून कमी लोकसंख्येची राज्ये) सिक्किम पहिल्या (२०२२मधील क्रमावारी:१) स्थानावर आहे, त्याखालोखाल हिमाचल प्रदेश (२०२२: ६वे स्थान), आणि अरुणाचल प्रदेश (२०२२: २रे स्थान) यांचा क्रमांक लागतो. अन्य राज्यांमध्ये आयजेआर २०२२ आणि आयजेआर २०२५ यांची तुलना करता, बिहारने सर्वाधिक सुधारणा दाखवली आहे. छत्तीसगढ आणि ओडिशा या राज्यांचे क्रमांक त्याखालोखाल लागतात. उत्तरप्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांची कामगिरी सुधारणेच्या निकषावर अन्य सात राज्यांच्या तुलनेत अधिक चांगली आहे. या अन्य राज्यांमध्ये हरयाणा, तेलंगणा, गुजरात यांचा समावेश होतो. (संदर्भ: इम्प्रुवमेंट स्कोअरकार्डचे इन्फोग्राफिक).

पोलीसखात्यातील स्त्रिया: त्यांची परिस्थिती काय आहे?

- पोलिसातील एकूण २,४२,८३५ स्त्रियांपैकी ९६० आयपीएस प्रवर्गातील आहेत (एकूण ७,४५०: डीआयजी, डीजी, आयजी, एआयजीपी, अॅडिशनल एसपी, एडीएलएसपी/डेप्युटी कमिशनर)
- २४,३२२ स्त्रिया नॉन-आयपीएस प्रवर्गात आहेत (एकूण ३,१०,४४४: डीवायएसपी, इन्स्पेक्टर, एआय आणि एएसआय
- १००३ डीवायएसपी स्त्रिया आहेत (एकूण ११,४०६: डीवायएसपी). मध्यप्रदेशात सर्वाधिक महिला डीवायएसपी (१३३) आहे.
- कॉन्सॅब्युलरीत २,१७,५५३ स्त्रिया आहेत (हेड कॉन्स्टेबल्स आणि कॉन्स्टेबल्सची संख्या १७,२४,३१२)

इंडिया जस्टिस रिपोर्ट (आयजेआर) अहवाल सर्वप्रथम टाटा ट्रस्ट्सद्वारे सुरू करण्यात आला, ही क्रमवारी सर्वप्रथम २०१९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली. या अहवालाची ही चौथी आवृत्ती आहे, सेंटर फॉर सोशल जस्टिस, कॉमन कॉज, कॉमनवेल्थ ह्युमन राइट्स इनिशिएटिव, दक्ष, टिस-प्रयास, विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी आणि हाउ इंडिया लिव्ह्ज यांसह अन्य काही सहयोगींच्या सहयोगाने हे सर्वेक्षण केले जाते.

न्यायमूर्ती (निवृत्त) मदन बी लोकुर इंडिया जस्टिस रिपोर्टवर चर्चा करताना म्हणाले, “व्यक्तीचा न्यायप्रणालीशी सर्वप्रथम संबंध आल्यानंतर लगेचच या व्यवस्थेतील दंडात्मक प्रक्रिया सुरू होते. पोलीस ठाण्यांतील कर्मचारी, पॅरालीगल कार्यकर्ते व जिल्हा न्यायालये आदी कायदेशीर सहाय्यता प्रक्रियेतील कर्मचारी या न्यायदान प्रणालीतील पहिल्या फळीला सुसज्ज करण्यात व प्रशिक्षण देण्यात आपल्याला पूर्णपणे अपयश आल्यामुळे जनतेच्या विश्वासाला तडा गेला आहे. समताधारित न्यायाप्रती आपली वचनबद्धता या संस्थाच पूर्ण करू शकतात. आपल्या संपूर्ण न्यायव्यवस्थेचे बळ या महत्त्वपूर्ण पहिल्या संपर्कबिंदूंमध्ये एकवटलेले आहे. सुधारणांचे प्रमाण कमी आहे आणि संसाधनांकडे पुरेसे लक्ष न दिल्यामुळे सुधारणा झालेल्या नाहीत हे इंडिया जस्टिस रिपोर्टच्या चौथ्या आवृत्तीतून अधोरेखित होते. त्यामुळे न्यायाच्या प्रतिक्षेतील व्यक्तींवरील ओझे कायम राहते आणि ते ओझे न्याय पुरवण्याची जबाबदारी असलेल्या सरकारांवर येत नाही.”

इंडिया जस्टिस रिपोर्टच्या मुख्य संपादक श्रीमती माया दारूवाला म्हणाल्या, “भारत लोकशाहीच्या शंभर वर्षांच्या दिशेने जात असताना, न्यायव्यवस्थेत सुधारणा झाल्याखेरीज कायद्याच्या राज्याचे व समान हक्कांचे वचन देणे निरर्थक आहे. सुधारणांना पर्याय नसतो. त्या करणे अत्यावश्यक आहे. उत्तम संसाधनांनी सुसज्ज अशी प्रतिसादक्षम न्यायप्रणाली ही घटनात्मकदृष्ट्या अत्यावश्यक आहे. प्रत्येक नागरिकाला दैनंदिन वास्तव म्हणून अशा व्यवस्थेचा अनुभव घेता आला पाहिजे.”

२४ महिन्यांच्या कठोर संख्यात्मक संशोधनाच्या आधारे तयार करण्यात आलेल्या आयजेआर-२०२५ या अहवालाने मागील तीन अहवालांप्रमाणेच अपेक्षित सेवा प्रभावीरित्या देण्याच्या दृष्टीने न्यायदान रचनांच्या सक्षमतेच्या निकषावर राज्यांच्या कामगिरीचे मापन केले आहे. अधिकारप्राप्त सरकारी स्रोतांकडून आलेल्या ताज्या अधिकृत आकडेवारीच्या आधारे, एरवी विस्कळीत असलेली माहिती न्यायदानाच्या चार स्तंभांमध्ये एकत्रित केली जाते. हे चार स्तंभ म्हणजे पोलीस, न्यायव्यवस्था, कारागृहे व कायदेशीर सहाय्यता. प्रत्येक स्तंभाचे विश्लेषण आर्थिक तरतूद, मनुष्यबळ, कामाचा भार, वैविध्य, संरचना व प्रवाह (पाच वर्षांच्या कार्यकाळात सुधारणेचे उद्दिष्ट) या मुद्दयांवर केले

जाते. राज्याने स्वत: घोषित केलेले मानक व मापदंड यांच्या निकषांवर हे मूल्यमापन केले जाते. या आवृत्तीमध्ये २५ राज्य मानवी हक्क आयोगांच्या क्षमतेचे (अधिक माहितीसाठी एसएचआरसीची माहिती बघा) स्वतंत्ररित्या मूल्यमापन करण्यात आले आहे. विकलांग व्यक्तींसाठी न्यायव्यवस्थेची उपलब्धता आणि ध्यानधारणेवरील लेखांचाही या आवृत्तीत समावेश आहे.

१८ मोठ्या व मध्यम आकाराच्या राज्यांचे रँकिंग:

| राज्य | रँक २०२५ | रँक २०२२ |
|---|---|---|
| कर्नाटक | १ | १ |
| आंध्र प्रदेश | २ | ५ |
| तेलंगणा | ३ | ३ |
| केरळ | ४ | ६ |
| तामिळनाडू | ५ | २ |
| छत्तीसगड | ६ | ९ |
| मध्य प्रदेश | ७ | ८ |
| ओडिशा | ८ | ११ |
| पंजाब | ९ | १० |
| महाराष्ट्र | १० | १२ |
| गुजरात | ११ | ४ |
| हरियाणा | १२ | १३ |
| बिहार | १३ | १६ |
| राजस्थान | १४ | १५ |
| झारखंड | १५ | ७ |
| उत्तराखंड | १६ | १४ |
| उत्तर प्रदेश | १७ | १८ |
| पश्चिम बंगाल | १८ | १७ |

सात लहान राज्यांचे रँकिंग:

| राज्य | रँक २०२५ | रँक २०२२ |
|---|---|---|
| सिक्कीम | १ | १ |
| हिमाचल प्रदेश | २ | ६ |
| अरुणाचल प्रदेश | ३ | २ |
| त्रिपुरा | ४ | ३ |
| मेघालय | ५ | ४ |
| मिझोराम | ६ | ५ |
| गोवा | ७ | ७ |

प्रेरणादायी सुधारणा, पण सतत तफावत:

<u>रिक्त जागा:</u>

न्यायपालिका: १.४ अब्ज लोकसंख्येसाठी, भारतात २१,२८५ न्यायाधीश आहेत, म्हणजेच दर दशलक्ष लोकसंख्येमागे अंदाजे १५ न्यायाधीश आहेत. हे १९८७ मध्ये कायदा आयोगाच्या दर दशलक्ष लोकसंख्येमागे ५० न्यायाधीशांच्या शिफारशीपेक्षा खूपच कमी आहे. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांमध्ये ३३ टक्के आणि जिल्हा न्यायपालिकेत २१ टक्के रिक्त जागा आहेत. याचा अर्थ न्यायाधीशांवर, विशेषतः उच्च न्यायालयांमध्ये कामाचा ताण खूप जास्त आहे. उदाहरणार्थ, अलाहाबाद आणि मध्य प्रदेश उच्च न्यायालयांमध्ये प्रति न्यायाधीश १५,००० खटले आहेत. राष्ट्रीय पातळीवर जिल्हा न्यायालयांमध्ये सरासरी कामाचा ताण प्रति न्यायाधीश २,२०० खटले आहे.

पोलिस: २८ टक्के अधिकारी पदे रिक्त असून कॉन्स्टेबलमध्ये २१ टक्के पदे रिक्त आहेत. राष्ट्रीय पोलिस आणि लोकसंख्येचे प्रमाण ८३१ आहे. सुचविलेले आंतरराष्ट्रीय मानक प्रति लाख लोकसंख्येमागे २२२ पोलिस कर्मचारी असले तरी भारतात प्रति लाख लोकसंख्येमागे फक्त १२० पोलिस कर्मचारी उपलब्ध आहेत (वास्तविक आकडेवारीनुसार).

कारागृहे: अधिकाऱ्यांमध्ये २८ टक्के, कॅडर स्टाफमध्ये २८ टक्के आणि सुधारक कर्मचाऱ्यांमध्ये ४४ टक्के पदे रिक्त असल्याने कारागृह कर्मचाऱ्यांमध्ये उच्च रिक्त पदे ही चिंतेची बाब आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये ४३ टक्के पदे रिक्त आहेत. मॉडेल प्रिझन मॅन्युअल (२०१६) कैदी-डॉक्टर गुणोत्तर ३०० कैदी प्रति १ डॉक्टर असे दर्शविते, पण भारताची राष्ट्रीय सरासरी ७७५ कैदी प्रति डॉक्टर आहे. खरेतर छत्तीसगड, हरियाणा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पश्चिम बंगालसह अनेक मोठ्या राज्यांमध्ये १,००० पेक्षा जास्त कैद्यांसाठी एक डॉक्टर होता.

फॉरेन्सिक्स: फॉरेन्सिक्समध्ये प्रशासकीय कर्मचाऱ्यांची रिक्त जागा ४७ टक्के आहे आणि वैज्ञानिक कर्मचाऱ्यांची रिक्त जागा ४९ टक्के आहे.

पॅरालीगल स्वयंसेवक किंवा पीएलव्ही: २०१९ ते २०२४ दरम्यान समुदाय-आधारित पीएलव्हींची संख्या ३८ टक्क्यांनी कमी झाली आहे, ज्यामध्ये तामिळनाडू, राजस्थान आणि पंजाबमध्ये सर्वात जास्त घट झाली आहे. आता, प्रति लाख लोकसंख्येमागे फक्त ३ पीएलव्ही आहेत. राष्ट्रीय पातळीवर, ५३,००० हून अधिक प्रशिक्षित पीएलव्हींपैकी फक्त एक तृतीयांश प्रत्यक्षात तैनात करण्यात आले होते.

<u>पायाभूत सुविधा:</u>

काही पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा झाली आहे, जसे व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधा असलेल्या कारागृहांच्या प्रमाणामध्ये वाढ (८६ टक्के), कोर्टहॉलच्या कमतरतेमध्ये थोडीशी घट (१४.५ टक्के), सीसीटीव्ही असलेल्या पोलिस स्टेशन्सच्या प्रमाणात सुधारणा (८३ टक्के) आणि प्रत्येक कारागृहामध्ये कायदेशीर सेवा क्लिनिक (१,३३० कारागृहांमध्ये १,२१५ क्लिनिक्स). गावांमध्ये कायदेशीर सेवा क्लिनिक्समध्ये घट झाली आहे (२०१७ मध्ये प्रत्येक क्लिनिकमध्ये ४२ गावे होती ती २०२४ मध्ये फक्त १६३). संपूर्ण भारतात, जानेवारी २०१७ ते जानेवारी २०२३ दरम्यान, ग्रामीण पोलिस स्टेशन्समध्ये ७३५ ने घट झाली आहे, तर शहरी पोलिस स्टेशन्समध्ये १९३ ने वाढ झाली आहे.

राष्ट्रीय स्तरावर कारागृहांमध्ये पायाभूत सुविधांची कमतरता दिसून येते. भारतातील कारागृहांमध्ये जास्त कैदी आहेत, राष्ट्रीय सरासरी कैदी संख्या १३१ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. २०२२ पर्यंत, उत्तर प्रदेशातील प्रत्येक ३ कारागृहांपैकी एका कारागृहात कैदी संख्या २५० टक्क्यांपेक्षा जास्त नोंदवली गेली. सध्याच्या दराने २०३० पर्यंत भारतातील कारागृहांमधील कैद्यांची संख्या ६.८ लाखांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, तर सध्याच्या क्षमतेच्या दराने कारागृहांची क्षमता ५.१५ लाखांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

दोन तृतीयांश पेक्षा जास्त कैदी (७६ टक्के) हे अंडरट्रायल कैदी आहेत. सर्वाधिक अंडरट्रायल कैदी कारागृहामध्ये जास्त वेळ घालवत आहेत, ज्यामध्ये ३-५ वर्षे कारागृहात राहणाऱ्या कैद्यांचे प्रमाण २०१२ मध्ये ३.४ टक्के होते, जे २०२२ मध्ये ६ टक्के झाले आहे. तसेच, ५ वर्षांपेक्षा जास्त काळ

कारागृहात घालवणाऱ्या कैद्यांची संख्या तिप्पट झाली आहे, जी याच कालावधीत ०.८ टक्क्यांवरून २.६ टक्के झाली आहे.

| |
|---|
| यूटीआरसीची कामगिरी: २०१९ ते २०२३ मधील आकडेवारीवरून राज्यांमधील कामगिरीत लक्षणीय तफावत दिसून येते. समित्यांनी देशभरातील जवळपास २.५ लाख कैद्यांना सोडण्याची शिफारस केली आहे, ज्यांच्या सुटकेचा सरासरी दर ४७ टक्के आहे. |

विविधता:

एससी/एसटी/ओबीसी: ५९ टक्के पोलिस एससी, एसटी किंवा ओबीसी वर्गातील कर्मचारी आहेत. पण, उच्च पदांनुसार तफावत आहे. ६१ टक्के पोलिस एससी, एसटी किंवा ओबीसी वर्गातील कर्मचारी आहेत, पण डीवायएसपी (उप पोलिस अधीक्षक) सारख्या वरिष्ठ पदांवर त्यांचे प्रमाण १६ टक्के आहे.

न्यायाधीश: जिल्हा न्यायव्यवस्थेत फक्त ५ टक्के न्यायाधीश अनुसूचित जमातीचे आहेत आणि १४ टक्के अनुसूचित जातीचे आहेत. २०१८ पासून नियुक्त केलेल्या ६९८ उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांपैकी फक्त ३७ न्यायाधीश अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या श्रेणीतील आहेत.

लिंग: विविधतेवर लक्ष केंद्रित केल्याने पोलिसांमध्ये महिलांचे प्रमाण किरकोळ वाढून १२ टक्के झाले आहे, पण, अधिकारी पातळीवर हे प्रमाण फक्त ८ टक्क्यांवर स्थिर आहे. एकूण महिला पोलिस दलातील ८९ टक्के महिला फक्त कॉन्स्टेब्युलरी पदांवर कार्यरत आहेत.

उच्च न्यायालये (१४ टक्के) आणि सर्वोच्च न्यायालय (६ टक्के) यांच्या तुलनेत जिल्हा न्यायालयात महिला न्यायाधीशांचे प्रमाण (३८ टक्के) जास्त आहे. सध्या, २५ उच्च न्यायालयांमध्ये फक्त एक महिला मुख्य न्यायाधीश आहे.

न्यायासाठीचे बजेट:

कायदेशीर मदतीवरील दरडोई खर्च ७ रुपयांपर्यंत पोहोचण्यासाठी संघर्ष करत आहे, तर पोलिसांवरील खर्च गेल्या ६ वर्षांत ५५ टक्क्यांनी वाढला आहे, राष्ट्रीय सरासरी आता १३०० रुपयांच्या जवळ आहे. पण, प्रशिक्षणावरील खर्च खूपच कमी आहे, पोलिसांच्या बजेटमध्ये प्रशिक्षण बजेटचे राष्ट्रीय सरासरी प्रमाण १.२५ टक्के आहे.

- कायदेशीर मदत: कायदेशीर मदतीवर राष्ट्रीय दरडोई खर्च दरवर्षी फक्त ६.४६ रुपये आहे.
- कारागृहे: कारागृहांवर राष्ट्रीय दरडोई खर्च ५७ रुपये आहे. २०२२-२३ मध्ये प्रति कैदी राष्ट्रीय सरासरी खर्च २०२१-२२ मधील ३८,०२८ रुपयांवरून वाढून ४४,११० रुपये झाला. आंध्र प्रदेशने कैद्यावर सर्वाधिक वार्षिक खर्च २,६७,६७३ रुपये नोंदवला आहे.
- न्यायपालिका: न्यायपालिकेवर राष्ट्रीय दरडोई खर्च १८२ रुपये आहे. कोणतेही राज्य न्यायपालिकेवर त्याच्या एकूण वार्षिक खर्चाच्या एक टक्क्यापेक्षा जास्त खर्च करत नाही.
- पोलिस: पोलिसांवर राष्ट्रीय दरडोई खर्च १,२७५ रुपये आहे - चार आधारस्तंभांमध्ये हा सर्वाधिक आहे.

आयजेआर २०२५ मध्ये तात्काळ आणि मुलभूत सुधारणांचा विचार करण्यात आला आहे. त्यात रिक्त पदे तातडीने भरण्याची आणि प्रतिनिधीत्व वाढवण्याची सूचना देण्यात आली आहे. अपरिवर्तनीय बदल घडवून आणण्यासाठी न्यायदानाला अत्यावश्यक सेवा म्हणून घोषित करण्याची विनंती करण्यात आली आहे.

---------

अधिक माहितीसाठी, कृपया संपर्क साधा:


वलय सिंग
इंडिया जस्टिस रिपोर्ट (indiajusticereport.org)
ईमेल: valaysingh@gmail.com
मो.: 9717676026


स्रोत:

1. पोलिस: डेटा ऑन पोलिस ऑर्गनायझेशन २०२३, ब्युरो ऑफ पोलिस रिसर्च अँड डेव्हलपमेंट
2. कारागृहे: प्रिझन सटॅटिस्टिक्स इंडिया २०२२, नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरो
3. नयायपालिका: २०२४ व २०२५ - नॅशनल जयुडिसियल डेटा ग्रिड (एनजेडीजी), कोर्ट नयूज, सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया; ईकोर्टस सर्विसेस; वेबसाइटस अँड अॅन्युअल रिपोर्टस ऑफ हाय कोर्टस, डिपार्टमेंट ऑफ जस्टिस
4. कायदेशीर मदत: २०२४, सटॅटिस्टिक्स फ्रॉम नॅशनल लीगल सर्विसेस ऑथोरिटी

परिशिष्ट १:

एकूण राष्ट्रीय निष्पत्ती: एका दृष्टिक्षेपात

**रिक्त जागा:**

राष्ट्रीय स्तरावर न्यायव्यवस्थेतील रिक्त पदे पुढीलप्रमाणे:

- **पोलिस**: २१ टक्के (कॉन्स्टेबल); २८ टक्के (अधिकारी)
- **कारागृहे**: २८ टक्के (अधिकारी), २८ टक्के (कॅडर कर्मचारी), ४४ टक्के (सुधार कर्मचारी), ४० टक्के (वैद्यकीय कर्मचारी), ४३ टक्के (वैद्यकीय अधिकारी)
- **न्यायपालिका**: ३३ टक्के (उच्च न्यायालयाचे न्यायाधीश), २१ टक्के (जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश), २७ टक्के (उच्च न्यायालयाचे कर्मचारी)
- **कायदेशीर मदत**: ६ टक्के (डीएलएसए सचिव)

**सुधारणा:**

- **पोलिस**: बिहारमध्ये पोलिस दलातील अधिकाऱ्यांचे प्रमाण ३० टक्क्यांवरून २३ टक्के आणि कर्नाटकमध्ये अधिकाऱ्यांचे प्रमाण ११ टक्क्यांवरून १.२ टक्के.
- **कारागृहे**: मध्य प्रदेशमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाण ७२ टक्क्यांवरून ३१ टक्के आणि उत्तर प्रदेशमध्ये अधिकाऱ्यांचे प्रमाण ३६ टक्क्यांवरून २५ टक्के.
- **न्यायपालिका**: पुदुचेरीमध्ये जिल्हा न्यायालयातील न्यायाधीशांचे प्रमाण ५८

**विविधता**
**एससी/एसटी/ओबीसी प्रतिनिधित्व:**

- **पोलिसां**मध्ये प्रमाण: **ओबीसी**: ३१ टक्के, **एससी**: १७ टक्के, **एसटी**: १२ टक्के
- **न्यायपालिके**त प्रमाण: **ओबीसी**: २५.६ टक्के, **एससी**: १४ टक्के, **एसटी**: ५ टक्के
- पोलिस अधिकारी व कॉन्स्टेब्युलरीमध्ये एससी, एसटी आणि ओबीसी पदांसाठीचा कोटा सातत्याने पूर्ण करणारे कर्नाटक हे एकमेव राज्य आहे.

न्यायव्यवस्थेमध्ये महिला: **इंडिया जस्टिस रिपोर्टमध्ये ५ वर्षांमधील चेंजओव्हर**
**पोलीस:**

- पोलिसांमध्ये महिलांचे एकूण प्रमाण २०१६ मध्ये ७.२८ टक्क्यांवरून २०२२ मध्ये १२.३२ टक्क्यांपर्यंत वाढले आहे.
- याच कालावधीत अधिकारी पातळीवर हे प्रमाण ५.५ टक्क्यांवरून ७.९ टक्क्यांपर्यंत वाढले आहे.
- २०२२ मध्ये आयपीएस पदांवर महिलांची संख्या: ९६०
- १५ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये अजूनही १० टक्क्यांपेक्षा कमी महिला पोलिस आहेत.

**न्यायपालिका:**

- जिल्हा न्यायव्यवस्थेत महिला न्यायाधीशांचे एकूण प्रमाण २०१७ मध्ये ३० टक्क्यांवरून २०२५ मध्ये ३८.३ टक्क्यांपर्यंत वाढले आहे.
- उच्च न्यायालयामध्ये महिला न्यायाधीशांचे प्रमाण २०१८ मध्ये ११.४ टक्क्यांवरून २०२५ मध्ये १४ टक्क्यांपर्यंत वाढले आहे.

**कायदेशीर मदत:**

**कामाचा ताण**

- **न्यायपालिका:**

**प्रलंबित खटले:** कर्नाटक, मणिपूर, मेघालय, सिक्कीम आणि त्रिपुरा वगळता **सर्व उच्च न्यायालयांमध्ये तीन वर्षांपेक्षा जास्त काळ प्रलंबित असलेल्या प्रत्येक दोन खटल्यांपैकी १**. अंदमान व निकोबार, अरुणाचल प्रदेश, बिहार, गोवा, झारखंड, महाराष्ट्र, मेघालय, ओडिशा, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल येथील जिल्हा न्यायालयांमध्ये **तीन वर्षांपेक्षा जास्त काळ प्रलंबित असलेल्या सर्व खटल्यांपैकी ४० टक्क्यांपेक्षा जास्त खटले आहेत.**

- **पोलिस:**

प्रति नागरी पोलिस संख्या: राष्ट्रीय पातळीवर ८३१ व्यक्तींसाठी १ नागरी पोलिस कर्मचारी उपलब्ध आहे.

- **कारागृहे:**

वैद्यकीय अधिकारी: भारतात ५७३,२२० पेक्षा जास्त कारागृहांतील कैद्यांसाठी फक्त ७४० वैद्यकीय अधिकारी आहेत. याचा अर्थ सरासरी ७७५ कैद्यांसाठी एक डॉक्टर आहे. सर्व कारागृहांमध्ये फक्त २५ मानसशास्त्रज्ञ/मानसोपचारतज्ज्ञ उपलब्ध आहेत.

**पायाभूत सुविधा**

- **सीसीटीव्ही:** जवळपास १७ टक्के पोलिस स्टेशन्समध्ये एकही सीसीटीव्ही नाही. १० पैकी जवळपास तीन पोलिस स्टेशन्समध्ये महिला मदत कक्ष नाहीत.
- ऑक्यूपन्सी: ५६ टक्के (७२४) कारागृहे १०० टक्के क्षमतेपेक्षा अधिक चालतात, जवळपास २० टक्के (२६२) कारागृहे १५० टक्के-२५० टक्के दरम्यान ऑक्यूपन्सी दर नोंदवतात. **देशातील १७६ कारागृहांमध्ये २०० टक्क्यांपेक्षा जास्त ऑक्यूपन्सी दर नोंदवला गेला**